# जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड

## पुरवठा विभाग

Email- dsonanded1@gmail.com Phone No(02462) 232521

---

क्रमांक 2018/पुवि/प्रशा8अ/टे-15/सिआर 43 दिनांक 07 सप्टेंबर, 2019

वाचाः 1) अन्न नागरी पुरवठा विभागाचे शासन निर्णय क्रमांक कंत्राट 1016/प्र.क्र.169/ ना.पु.16-अ, दिनांक 20 एप्रील, 2017

2) सहसचिव,महाराष्ट्र शासन अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्रमांकः कंत्राट-1118/प्र.क्र.99/नापु.16-अ दि. 07 सप्टेंबर, 2019

## जाहीर प्रगटन

**विषय ः- नांदेड जिल्हयातील लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील अन्नधान्य वाहतुकीच्या कंत्राटाबाबत...**

याद्वारे सूचित करण्यात येते की, सहसचिव, महाराष्ट्र शासन अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचे कार्यालयीन पत्र क्रमांकः कंत्राट-1118/प्र.क्र.99/नापु. 16-अ दिनांक 07 सप्टेंबर, 2019 अन्वये मे. पारसेवार अँड कंपनी नवा मोंढा नांदेड या कार्यरत वाहतुक कंत्राटदाराचे वाहतुकीचे कंत्राट रदद करण्याबाबत आदेशित केले आहे त्यानुषंगाने लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत धान्य उपलब्धतेच्या हमीकरीता पहिला टप्पा भारतीय अन्न महामंडळाचे बेस डेपो CWC / MSWC ते शासकीय धान्य गोदामापर्यंत व दुसरा टप्पा शासकीय धान्य गोदाम ते स्वस्त धान्य दुकानापर्यंत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे शासन निर्णय क्रमांक कंत्राट 1016/ प्र.क्र.169/ ना.पु.16-अ, दिनांक 20 एप्रील, 2017 मधील अटी व शर्तीनुसार पर्यायी व्यवस्थेंतर्गत अथवा जिल्हयामध्ये नवीन नियमित वाहतुक कंत्राट निश्चितीची प्रक्रिया होईपर्यंत जिल्हयातील अन्नधान्य वाहतुकीचे काम करुन घेण्याकरीता खालील अटी व शर्तीनुसार दरपत्रक मागविण्यात येत आहेत.

- नांदेड जिल्हयातील अन्नधान्य वाहतुकीकरीता इच्छुक वाहतुकदारांनी बंद पाकीटामध्ये ऑफलाईन पध्दतीने जिल्हा पुरवठा कार्यालयात विहीत मुदतीत दरपत्रके सादर करावी लागतील.
- अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे शासन निर्णय दिनांक 20 एप्रील, 2017 मधील सर्व अटी व शर्ती लागु राहतील त्यामुळे सदर शासन निर्णयाचा सखोल अभ्यास करुन दरपत्रके सादर करावीत.
- सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे तसेच या शासन निर्णयाची एक प्रत या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावण्यात येत आहे.
- अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे शासन निर्णय दिनांक 20 एप्रील, 2017 मधील अट क्रमांक 5.5 अन्वये नमूद केलेली आवश्यक कागदपत्र् वाहतुकदारास दरपत्रकासोबत सादर करणे अनिवार्य आहे.
- शासन निर्णय दिनांक 20.04.2017 मधील मुददा क्रमांक 4.9 अन्वये अन्नधान्य वाहतुकीसाठी मालकीच्या व नियंत्रणाखालील वाहनांची एकत्रित वहन क्षमता असावी लागेल.

- जिल्हयातील अन्नधान्य वाहतुकीसाठी वाहतुकदाराकडून कमीत कमी 3 दरपत्रके येणे अनिवार्य आहे. 3 दरपत्रक प्राप्त झाल्यानंतरच सदर वाहतुकीचे दरपत्रक उघडण्यात येतील.
- जिल्हयातील कार्यरत वाहतुक कंत्राटदार यांचे दर नांदेड जिल्हयातील पहिला टप्पा भारतीय अन्न महामंडळाचे बेस डेपो ते शासकीय धान्य गोदामासाठी 65.00 रुपये प्रति क्विंटल संपुर्ण अंतराकरीता व दुसरा टप्पा दर शासकीय धान्य गोदाम ते स्वस्त धान्य दुकानापर्यंत रुपये 4.52 प्रति क्विंटल संपुर्ण अंतरासाठी असे अन्नधान्य वाहतुकीचे एकत्रीत दर 69.52 रुपये आहेत.
- प्राप्त होणा-या दरपत्रकातील दर हे जिल्हयातील कार्यरत वाहतुक दरांच्या मर्यादेत असल्यास अशा दरपत्रकास जिल्हाधिकारी नांदेड यांचे स्तरावर मंजूरी देण्यात येईल.
- ज्या वाहतुकदाराची दरपत्रके ही जिल्हयातील कार्यरत वाहतुक दरांपेक्षा जास्तीचे प्राप्त झाल्यास वाटाघाटी अंती मंजुर करण्यात आलेल्या जास्तीचे दरपत्रकास मा.प्रधान सचिव, अन्न नागरी पुरवठा विभाग मंत्रालय, मुंबई यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल.
- जिल्हयातील अन्नधान्य वाहतुकीसाठी मंजूर करण्यात आलेली दरपत्रके जिल्हयामध्ये नवीन नियमित वाहतुक कंत्राट निश्चितीची प्रक्रिया होईपर्यंत लागु राहतील
- तसेच अन्न नागरी पुरवठा विभागाचे दिनांक 20.04.2017 मधील शासन निर्णयामधील मुददा क्रमांक 10.6 ते 10.9 नुसार जिल्हयातील अन्नधान्याचे नियतन, भारतीय अन्न महामंडळापासून ते गोदामापर्यंतचे सरासरी अंतर, दुकानांची संख्या, इत्यादीची माहिती जिल्हा पुरवठा कार्यालयात उपलब्ध आहे. सदर माहिती उपलब्ध करुन घेवून सर्व बाबींचा अभ्यास करुन वाहतुकीचे दरपत्रक भरावीत.
- वाहतुकदाराची शासन निर्णय दिनांक 20.04.2017 मध्ये नमूद केल्यानुसार आर्थीक उलाढाल असणे आवश्यक आहे.
- शासन निर्णय दिनांक 20 एप्रील,2019 मधील सर्व तरतुदी लक्षात घेवून दरपत्रक सादर करावेत. मागाहून दरातील बदलाबाबत विनंती अथवा कोणत्याही प्रकारच्या तक्रारीची दखल घेतली जाणार नाही.
- सदर दरपत्रकाचा नमुना जिल्हा पुरवठा कार्यालयात पी.एल.ए. शाखेतून प्राप्त करुन घेण्यात यावेत.
- प्राप्त झालेली सर्व दरपत्रके मंजूर अथवा नामंजूर करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी नांदेड यांना राहतील.

तरी इच्छुक वाहतुकदारांनी नांदेड जिल्हयातील अन्नधान्य वाहतुकीसाठी शासन निर्णय दिनांक 20.04.2017 मधील सर्व अटी व शर्तीचा अभ्यास करुन व वरील नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार वाहतुकीचे दरपत्रक बंद पाकीटामध्ये जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय, नांदेड येथे दिनांक 12.09.2019 रोजी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत सादर करावेत. विहीत मुदतीनंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

3/09/2019

जिल्हाधिकारी नांदेड